**२. शेगांवपासून अठरा मैल अंतरावर असलेले काटेलकोलाद ग्राम :–**

या ठिकाणी श्री संत गुलाबबाबांचा आश्रम असून फार मोठे देवांगण आहे. या ठिकाणी गुलाबबाबांनी खोदलेल्या अमृतकुंडाचे फार मोठे महात्म्य आहे. अनेक भक्तांना त्याची प्रचीती आजही बघावयास मिळते. काही भक्त नागपूर मुक्कामात श्री संत गुलाबबाबाचे दर्शनासाठी काटेलकोलादला जातात. त्या ठिकाणी सुद्धा श्री संत गुलाबबाबा नागपूरला असले तर काटेलला एकाच वेळी भक्तांना दर्शन देतात. अमृतकुंडातील पाण्यानी अनेक भक्तांचे रोग दूर झाले आहे ते अमृत कुंड असलेल्या पवित्र झऱ्यातील कितीही पाणी काढले तरी ते काठोकाठ तुडुंब भरलेले असते हे बघावयास सापडते.

**३. पारस येथील घडलेला चमत्कार :–**

अकोला जवळील पारस गावातील एका मुलाचा जीव श्री संत गुलाबबाबांनी वाचविला असे काही भक्तगणांच्या तोंडून ऐकावयास मिळते.

**४. उमरेड :–**

पेट्रोल शिवाय मोटार चालविणे हा प्रकार उमरेड सोडून अन्य ठिकाणीसुद्धा झालेला आहे. एवढेच नव्हे तर श्री संत गुलाबबाबा हात बांधून ट्रॅक्टर चालवितात हे एका भक्ताने बघितले त्यांनी हा अनुभव सांगितला आहे.

**५. गर्भश्रीमंत गुजराथी माणसाला काटेल कोलादचे दर्शन घडवून देणे :—**

"पैसा" हेच सर्वस्व नव्हे याची ओळख गुजराथी माणसांना श्री संत गुलाबबाबांनी करून दिली होती. प्रवासात भेट झाल्यानंतर त्या व्यक्तींना काटेलला घेऊन गेले. संपूर्ण सहाय्य केले. पैसा असूनही त्यांचा पैसा प्रवासात निकामी ठरला. श्रीमंतीचा गर्व कसा नाहीसा होतो हे सर्व भक्तांना गुलाबबाबांनी दाखवून दिले.

**६. मालेगांव :–**

वाद्ये नसताना वाद्ये वाजतात असे दिसणे (एका स्त्रीभक्ताचा अनुभव).

श्री संत गुलाबबाबांचे अशा तऱ्हेचे नागपुरातील व अन्य ठिकाणच्या वास्तव्यात भक्तांना छोटे मोठे अनुभव येत असतात. तशाचपैकी एका भक्तास प्रवासात बस मधून उतरताना पेटी आपोआप वाजत असताना दिसली. वरील लीलाव्यतिरिक्त विषयुक्त दूध गिळंकृत करणे, असाध्य रोग दूर करणे, तबला वाजवून पाऊस आणणे, प्रसाद देणे, शिजविलेले मोजके अन्न पंक्ती उरकल्यानंतरही उरणे, गेलेल्या विजेला हुकमाने प्रकाशमान करणे, दुःख दूर करणे, एकाच वेळी भिन्न कार्यक्रमास हजर राहाणे, रोगमुक्त होणे, अशाच प्रकारचे विविध चमत्कार गुलाबबाबांनी करून दाखविले आहेत. पोटांचे दुखणे दुरुस्त करणे, काटेलला भक्त डबा खात असताना नाग दिसणे, घरच्या

पूजेत हवा चालू नसताना फोटोचा हार हालताना दिसणे, आशिर्वाद दिल्यानंतर कार्य सिद्धीस जाणे, स्वप्नात जाऊन दुःख हरण करणे, नाव घेतल्याबरोबर कार्य सिद्धीस जाणे, रस्त्याने चालताना भक्तांना भिन्न अनुभव येणे, स्वप्नात येऊन दर्शन देणे इत्यादि.

असे शेकडो अनुभव अनुभवलेल्या व्यक्ती संपूर्ण महाराष्ट्रभर सापडतील. मी स्वतः प्रवासात बस सुटली असताना बस थांबली याचा अनुभव घेतला आहे. श्री संत गुलबबाबा गरीब श्रीमंत भेदभाव ठेवीत नाहीत. गरिबांचा तर त्यांना अधिक जिव्हाळा वाटतो. त्यांच्या सान्निध्यात येणाऱ्या व्यक्तीना अवर्णनीय आनंद मिळतो. अनेक भक्त त्यांच्या दर्शनाचा लाभ घेत असतात. त्यांच्या संगतीत राहतात व त्यांना आलेले अनुभव एकमेकांना सांगतात. ★

# वाऱ्यावरचे विचार

ले.—द. शं. टिपणीस
वजिफदार लॉज, गोखले रोड, ठाणे

## २१. महाबळेश्वराची सहल

● ही एक सत्य घटना आहे. ती ऐकत असता वाऱ्यावरून कुठूनतरी विचार आले व पुरातन सत्य सुचवून गेले. ती घटना अशी, महाबळेश्वरची सहल. मुंबईचे १५–२० शिक्षक सहलीला आले होते. मुंबई ते महाबळेश्वर (महाड मार्गे) नंतर पुणे, सिंहगड, देहू, आळंदी व पनवेल मार्गे परत अशी ही स्वतंत्र बसची गोल सफर होती. रात्री ८॥च्या सुमारास सहली महाबळेश्वरास आले. इकडे तिकडे फिरून सृष्टीसौंदर्याचा आस्वाद काळोखामुळे घेणे शक्य नव्हते. लोकांनीही आम्ही मुंबईचे पाहुणे म्हणून अनाहूत सल्ला दिला. आता फिरू नका. गपचूप जावा व झोपा. उद्या दिवसा उजेडी सर्व पहाता येईल. रात्री बंद खोलीत झोपा. उघड्यावर झोपू नका. इथल्या जंगलात वाघ आहेत. ते रात्री कधीमधी गावातून फिरतात. तुम्ही नवे. तुमची व त्यांची ओळख नाही. पाहिल्यावर गुरगुरतील. चटणी त्यांच्या फार आवडीची. ज्यांची पहिली सहल होती ते घाबरले. अनुभवी होते ते अं म्हणून गप्प राहिले. मुक्कामासाठी एक खोली घेतली होती. आणलेल्या शिदोऱ्यांवर चांगला ताव मारला. मग दारे खिडक्या चक्क बंद करून सर्व जण झोपी गेले. १–१॥ चा सुमार असेल. कोणीतरी मोठ्याने ओरडला, वाघ रे वाघ. बाप रे पळा. आवाज ऐकून सर्वजण दचकून जागे झाले व ताडकन उठून उभे राहिले. इकडे तिकडे पाहू लागले. थरथरु लागले. 'ए, दार पक्के बंद आहे ना ?' एक

धावऱ्या. दुसरा एक धीट, त्याने खिडकी उघडून बाहेर बघण्याचा प्रयत्न. सगळे एकदम ओरडले, 'ए बंद कर. गजातून आत येईल ना.' सगळे भेदरून बसले. पुन्हा आवाज वाघ रे वाघ. पळा. एकाचे लक्ष गेले. तो झोपेत ओरडत होता. 'अरे हा झोपेत ओरडतो आहे. स्वप्न पडले येड्याला. दुसरे काय ? आता भीतीचा विनोद झाला. त्याला हलवून हलवून जागा केला. सगळ्यांचा जीव भांड्यात पडला व देह बिछान्यावर. पुन्हा झोपाझोप. सकाळी लोक विचारू लागले. काय राव, घाबरलात का ? कोण ओरडत होता ? या गावामध्ये वाघ येईल काय ? मग इंग्रज पाहिजेत कशाला ? असं हे स्वप्न. स्वप्नातला वाघ त्याला खरा वाटला व तो कोकलला. नकलीला–स्वप्नाला आपण प्रतिसाद देतो. सत्याकडे पाठ करतो. जागे होतो तेव्हा कळते हा सर्व भास. मग स्वतःच स्वतःला हसतो. अगदी संसार हा असाच. जीवन म्हणजे एक दीर्घकाल चालणारे स्वप्नच जागे झाल्यावर मात्र हे जागवर्त.

## २२. छत्री

छत्री. सर्वांच्या परिचयाची. म्हणून विनोदाने हिला सहधर्मचारिणीला छत्री म्हटलं तर हरकत नसावी. कारण अ = ब म्हणजेच ब = अ हे सत्य आहे, आणि खरोखरच पत्नी ही पतीला संसारात छत्रीसारखी आहे. छाया आहे, संकटकाली दिलासा देणारी आहे, संसारातील रखरखत्या उन्हात थंडावा देणारी आहे, तिकडून कचेरीतून येण्याचे वेळी दारात उभे असलेल्या पत्नीचे एक हसू पतीचे लाख आसू पुसून टाकते. असे काही साहित्यिक म्हणतात. निरनिराळ्या ऋतूत छत्रीचे निरनिराळे उपयोग होतात. पत्नीही निरनिराळ्या वेळी संसारात नाना तऱ्हेने साथ देते. उन्हात छाया देऊन उबणाऱ्या जिवाला छत्री थंडावा देते. तसेच पत्नी संकटकाळी छायेसारखी जवळ राहून पतीला दिलासा हुरूप देते. थंडीमध्ये झोंबणाऱ्या वाऱ्यापासून छत्री संरक्षण करते. तसेच आपत्काळी समाजाकडून होणाऱ्या झोंबणाऱ्या टीकेपासून आपल्या पतीला वाचविण्यासाठी पत्नी आपल्या प्रेमाचा आडोसा करते. रस्त्याने जाताना नको असलेल्या व्यक्तीला चुकवून पुढे जाण्यासाठी छत्रीचा उपयोग होतो. तसेच पत्नी बरोबर असली तर तिच्याशी बोलण्याच्या मिषाने अशा व्यक्तीकडे कानाडोळा करून पुढे सटकता येते. आपल्याकडे नवी छत्री असली की लोकांचे तिच्याकडे अचूक लक्ष असते. ओळखीचा भेटला तर लगेच नवी आणली ? विकत घेतली ? कोठे ? काय दिलेत ? वगैरे प्रश्नांचा भडिमार करून मोकळा होतो. पत्नी नवी नवरी (जुनी असते का ?) असली की असाच तोफखाना चालू होतो. काय लग्न केलेत ? (बेट्या, तुला काय वाटलं पळवून आणली होय ? कधी ? हुंडापांडा ? देणं घेणं ? नोकरी ? वगैरे सरबत्ती चालू. नवी छत्री विशेषतः सुंदर असली तर ती वेळीअवेळी बरोबर घेऊन फिरण्याची पुष्कळांना हौस असते. तसेच काही पतींना आपली नवपत्नी घेऊन फिरण्याची अनावर ओढ असते. नवीन सुंदर छत्रीच्या बाबतीत गर्दीच्या वेळी

सावधगिरी बाळगावी लागते नाहीतर ती केव्हा कुठे गायब होईल याचा पत्ता लागणार नाही. तरुण पत्नी बरोबर घेऊन अशीच सावधगिरी हल्लीच्या परिस्थितीत बाळगावी लागते. कित्येक लोक छत्रीप्रमाणे पत्नीलाही डोक्यावर घेऊन वाटचाल करतात. छत्री ही डोक्यावर धरायची असली तरी कित्येक वेळा काटा सैल झाल्यास ती फटकन डोक्यावर बसते. समतोल न राखल्यास पत्नीही डोक्यावर बसते. छत्री व पत्नी दोन्ही सहचारिणी असल्या तरी विरोधीही आहेत. त्याकडे नीट लक्ष दिले तर ठीक नाही तर छत्री जशी भरपावसात दगा देऊन आपल्यास भिजवल्याशिवाय सोडीत नाही तसं पत्नीच्या बाबतीत होण्याचा संभव असतो. कित्येक वेळा छत्री उघडायला जावं तो ती फुगून बसलेली असते. (बांबू युगात हे फार होई) व मग उघडता उघडत नाही. पत्नी केव्हा फुगेल याचा नेम नाही व मग काही केल्या तिचे तोंड उघडायचे नाही. छत्री ही पावसात आसरा असली तरी एकाएकी उलटून आपणास केव्हा तोंडघशी पाडील याचा नेम नाही. पत्नीही संसारात एकाएकी केव्हा उलट फिरेल याचा भरवसा नाही. यामुळे छत्रीप्रमाणेच पत्नीलाही सांभाळून आंजारून गोंजारून हाताळावी लागते. धसमुसळेपणा दोघींनाही रुचत नाही. एका काव्यात एक स्त्री पुरुषास म्हणते, कधी मी नाचणार—कधी मी रुसणार—तुझ्यासंगे—मागे मागे—घेऊन आढेओढे वगैरे, हे छत्रीच्याही बाबतीत खरं आहे असा अनुभव वादळी पावसात आपणास येतो त्यावरून वाटते.

## २३. धोक्याची घंटा

रात्री १-२ चा सुमार असेल. गाढ झोपलो होतो. झोपेत घण घण असा घंटेचा मोठा आवाज ऐकला. असेल स्वप्नात असं म्हणून या कुशीवरून त्या कुशीवर वळलो. पण घंटा घुमतच होती. जागा झालो व ध्यानी आलं की ही तर फायर ब्रिगेडची घंटा. जवळच फा. ब्रि. चे स्टेशन होते. गॅलरीत आलो काय झाले– पहाण्यासाठी. आजु-बाजूच्या गॅलऱ्यातून व खिडक्यातून माझ्या आधीच अनेक चेहरे डोकावत होते. समोरून दोन इंजिनं घण् घण् करीत वेगाने निघून गेली. कोठेतरी आग लागली असावी वा इतर गंभीर धोका असावा. हल्लीचे फा. ब्रि. हे पूर्वीचे फा. ब्रि. राहिले नाहीत. ते ऑल परपज झाले आहेत. त्यामुळे आगीप्रमाणेच, पूर येणे, घर पडणे, भिंताडं कोसळणं वगैरे प्रसंगीही फा. ब्रि. चा उपयोग होतो. एकीनं एकदा तर घरात चुल पेटली म्हणून फा. ब्रि. ला फोन केला अशी लोकदंतकथा आहे. घंटा कानाला त्रास देते व मनाला घाबरविते खरं. पण ती धोक्याची सूचना आहे. यामुळे फा. ब्रि. मदतीला धावतो व सर्व पुनःश्च ठीक होते. घरात गेलो. बिछान्यावर पडलो, विचार आला की शारिरीक वेदनाही अशाच धोक्याच्या सूचना तर नसतील ना? हो. अगदी तस्सेच आहे. शरिरात कोठे काही बिघाड झाला की वेदनारूपी घंटा वाजू लागते. शरिरातील अग्निशामक दल म्हणजे शरीर दुरुस्त करणारे घटक लगेच घटनास्थळी धावत जाऊन जरूर ती मदत

देतात व सर्व ठीक करतात. ही झाली अंतरगत व्यवस्था. बहिर्गतही व्यवस्था आहे. वेदनारूपी घंटा वाजू लागल्या की डॉक्टररूपी अग्निशामकाला आपण बोलावतो. तो आपले सहकारी मिक्चर, गोळ्या, इंजेक्शन यांच्या साह्याने आग पसरू देत नाही व पूर्ण विझवून टाकतो. शरीराला वेदना होत नसल्या तर काय अवस्था झाली असती ? पहा. उदाहरणार्थ, पोटात वेदना होऊ लागल्या की आपण समजतो पोटात कुठेतरी काही बिघाड झाला आहे व मग दुरुस्तीच्या कामासाठी धावाधाव करतो. वेदना झाल्या नसत्या तर पोटात अलसर वा अन्य विकार झालेला आपल्यास कधीच कळला नसता. सर्व ठीक आहे या समजुतीखाली आपण बेसावध राहिलो असतो. व आग भडकत जाऊन शेवटी त्यात आपला बळी पडला असता. असंच शरीराच्या इतर भागासंबंधी. वेदना ही गोष्ट काही आपल्या दृष्टीने चांगली नव्हे हे खरं असलं तरी ती देवाने आपल्या कल्याणासाठीच निर्माण केली आहे. देव करतो ते चांगलेच करतो ते हे असं.

●

---

# वाचकांचा पत्रव्यवहार —

**संपादक "साईलीला" यांस—**

स. न. वि. वि.

'श्री साईबाबा सत्संग मंडळ, सुरत' या संस्थेने भक्तांच्या प्रत्ययास आलेले उत्कट अनुभव "युगावतार श्री साईबाबा" ह्या गुजराथी भाषेतील ग्रंथात संग्रहित केले आहेत, त्याबद्दल त्यांना शतशः धन्यवाद ! पण त्याचबरोबर, त्या संस्थेने साईलीलेच्या मराठी वाचकांसाठी, ते सुरस अनुभव, प्रकाशित करण्यास परवानगी दिल्यामुळे आम्ही मराठी वाचक त्यांचे खूप-खूप ऋणी आहोत. हे सुरस अनुभव आम्हा मराठी वाचकांना बाबांची खरी ओळख करून देतील यात वाद नाही.

"श्रीसाईलीला" मधील या नवीन सदराबद्दल धन्यवाद.

**श्री. व श्रीमती आर. जी. डुबल**

विक्रोळी, टागोरनगर, मुंबई नं. ८३

ग्रंथभेटी

# श्रीलइराईचे अग्निदिव्य

(लेखक – श्री. सदानंद गडेकर, प्रकाशिका – सौ. उज्ज्वला गडेकर, उज्ज्वल प्रकाशन, १/२० गजानन कॉलनी, जवाहर नगर, गोरेगाव मुं ६६. किंमत ४ रु. पृष्ठे ६८)

गोमंतकातील शिरगाव येथल्या श्रीदेवी लयराईची जत्रा ही सर्वात मोठी जत्रा म्हणून ओळखली जाते. या जत्रेत अक्षरशः फुललेल्या निखाऱ्यातून चालत जाण्याचा एक कार्यक्रम असतो. तो पहाण्यासाठी धमाल गर्दी तिथे जमते. शेकडो वर्षांपासून हो आजतागायत सदरहू जत्रेचा उत्सव तिथे चालत आलेला आहे. या देवी लय-राईच्या जागृत देवस्थानाची संपूर्ण माहिती ऐतिहासिक, धार्मिक इ. ची या पुस्तकात ओघवत्या शैलीने मांडलेली आहे, ती वाचता वाचता मन चांगलेच रमते. वैशाख शु. पंचमी हा या देवीच्या जत्रेचा दिवस. या दिवशी देवीसमोर नवस फेडणारी घोण मंडळी धगधगत्या अग्नीकुंडातून अक्षरतः चालत जातात, परंतु त्यांना कसलीच इजा होत नाही. या भयचकीत करणाऱ्या प्रसंगाचे वर्णन या पुस्तकात आहे. पुस्तकात प्रसंगानुरूप छायाचित्रे पण आहेत. त्यामुळे मजकुरास चांगलाच उठाव आला आहे. मुखपृष्ठावरील सुंदर चित्र कै. रघुवीर मुळगांवकर यांनी चितारलेले आहे. प्रत्येक भाविकाने आपल्या संग्रही अवश्य ठेवावे असे हे माहितीपूर्ण पुस्तक आहे. ●

# गुरुवर्य पी. एम. रानडे व्यक्तिदर्शन

(प्रकाशक– श्री. गजाननराव कांबळे, अध्यक्ष पी. एम. रानडे सत्कार समिती, देवांग मिल, नारायण पेठ, इचलकरंजी, संपादक– प्रा. शिवराम माळी, किंमत २१ रु. पृष्ठे २०८)

इचलकरंजीच्या नारायणराव बाबासाहेब एज्युकेशनल सोसायटीचे शिल्पकार, गोविंदराव हायस्कूलचे नामवंत मुख्याध्यापक, इंग्रजीचे प्रकांड पंडित गुरुवर्य पी. एम. रानडे यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करणारा हा गौरव ग्रंथ आहे. पी. एम. सरांनी इचलकरंजी व परिसरामध्ये जी शैक्षणिक क्रांती केली, शिक्षणाच्या प्रसार-प्रचार कार्यात जे कष्ट घेतले त्याची साद्यंत हकीगत या ग्रंथात आहे. विशेषतः पी. एम. सरांचा सहवास लाभलेल्या एकूण ७२ नामवंत व्यक्तींनी या ग्रंथाला लेखन करून हातभार लावला आहे व आपापल्या परीने सरांची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. एका गुणी, चारित्र्यसंपन्न, कर्तृत्वशाली व ध्येयवादी शिक्षकाच्या चिकाटीने केलेल्या महान कार्याचा

यथोचित गौरव या ग्रंथरूपाने झालेला आहे याचे समाधान वाटते. आम्ही पी. एम. सरांचे या प्रसंगी मनःपूर्वक अभिनंदन करतो व त्यांच्या सत्कार समितीला धन्यवाद देऊन या ग्रंथाचे संपादन प्रा. शिवराम माळी यांनी उत्कृष्ट प्रकारे केले याबद्दल त्यांचे कौतुक करतो.

– श्रीसाईनंद

●

# श्रीसाईधाम, गिरगावचा

## रौप्यमहोत्सव थाटात साजरा

● गिरगावातील काँग्रेसहाऊसजवळील श्रीसाईधामवाडीतील श्रीसाईधाम या संस्थेचा रौप्यमहोत्सव केळेवाडी येथील साहित्य संघ मंदिरात मोठ्या थाटाने साजरा झाला. श्रीसाईधाम ही संस्था भगवान श्रीसाईबाबांच्या भक्तिसंप्रदायाचा, त्यांच्या आदर्शभूत जीवनाचा, त्यांच्या विचार व तत्त्वप्रणालीचा गेली पंचवीस वर्षे प्रसार-प्रचार मुंबापुरीत करीत आहे. ता. ७ डिसेंबर १९५१ रोजी ही संस्था स्थापन झाली. या संस्थेतर्फे आज विविध उपक्रम चालू आहेत; व या शहरातील हजारो भाविक रोजच्या रोज श्रीबाबांच्या दर्शनास सारखे येत असतात. संस्थेच्या रौप्यमहोत्सवप्रसंगी माननीय श्री. पी. के. उर्फ बाळासाहेब सावंत हे अध्यक्ष होते तर श्री. वि. स. पागे, श्री. प्रमोद नवलकर इ. मंडळी प्रमुख पाहुणे म्हणून हजर होती. या समारंभप्रसंगी संस्थेने आपल्या जुन्या कार्यकारी सेवकांचा शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार केला. या रौप्यमहोत्सवप्रसंगी संस्थेने एक सुंदर स्मरणिका प्रकाशित केली होती; तिचे लेखन व संपादन श्री. सदानंद चेंदवणकर, कार्यकारी संपादक "श्रीसाईलीला" यांनी केले होते. संस्थेने त्यांचाही याप्रसंगी सत्कार केला. समारंभात श्री. चकोर आजगांवकर लिखित श्री. साईगीतायनचा व वसंत बहार वाद्यवृंदचा बहारदार कार्यक्रम झाला. श्री. डी. बी. उर्फ भाईसाहेब मालपेकर या संस्थेचे १९६० सालापासून तो आजतागायत अध्यक्ष आहेत; व त्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेने भरपूर प्रगती साधली असून दिवसेदिवस तिचा विकासच होत आहे. रौप्यमहोत्सवानंतर अहमदाबादचे सुविख्यात वयोवृद्ध साईभक्त स्वामी श्रीसाईशरणानंदजी यांनीही साईधामला भेट देऊन कार्यकर्त्यांचे कौतुक केले. त्यांचाही अध्यक्षांनी यथोचित सत्कार केला.

★

# श्रीसाई सेवाधाम, पिळगाव गोवा
# गुरुपौर्णिमा उत्सव थाटात साजरा

● पिळगाव ( ता. डिचोली, गोवा) प्रतिवर्षीप्रमाणे श्रीसाई सेवा धाम मंदिरात गुरुपौर्णिमेचा उत्सव दोन दिवस मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. रविवार दि. ११-७-७६ रोजी पहाटे ५। वाजता काकड आरती, तदनंतर गायन, ९ ते १२ पर्यन्त भक्ताकडून अभिषेक, १२ वाजता व्यासपूजा, पहाटे मंगलवाद्याचा कार्यक्रम, १२-३० वाजता आरती, संध्याकाळी ५ वाजता श्रीसाईबाबांची प्रतिमा व पादुका यांची वाजत गाजत पालखीतून गावात मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत सर्वश्री वामन पिळगांवकर, श्रीपाद पिळगांवकर, यशवंत पिळगांवकर व काशिनाथ नार्वेकर ( वेंगुर्ला ) व अन्य साईभक्तांनी दिंडी कार्यक्रमात भाग घेतला. नंतर ७ वाजता धुपारती झाली. रात्री ८ ते १० पर्यंत ह. भ. प. मणेरीकर बुवा ( कुडाळ ) यांचे कीर्तन झाले. रात्री भजनाच्या व गायनाच्या कार्यक्रमांत सर्वश्री, बाबा कापडी, नाना शिरगांवकर, कमलाकांत धोंड, पांडुरंग चोडणकर, रघुवीर मांद्रेकर, काशिनाथ होबळे, मुकुंद कडकडे, नारायण पेडणेकर, मुकुंद नाईक, नारायण वेरेकर, विनायक नार्वेकर, जगन्नाथ पेठकर, काशिनाथ नार्वेकर व स्थानिक भजनी कलाकार सर्वश्री वामन पिळगांवकर, श्रीपाद पिळगांवकर, यशवंत पिळगांवकर या कलाकारांनी भाग घेतला.

दि. १२-७-७६ रोजी सकाळी अभिषेक, दुपारी १२ वाजता आरती व गायन, संध्याकाळी ५ वाजता ह. भ. प. मणेरीकरबुवा यांचे कृष्णलीलेवर किर्तन झाले. दहीकाल्याचा कार्यक्रम झाल्यावर धुपारती झाली व तिर्थप्रसाद होऊन उत्सवाची सांगता झाली. या दोन दिवसाच्या कार्यक्रमास डिचोली, साखळी व अन्य भागातील भक्तमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे आद्य संस्थापक श्री पांडुरंग गणू शिरोडकर व कार्यकारी मंडळाने विशेष परिश्रम घेतले. यंदाचा गुरुपौर्णिमा उत्सव श्री. चंद्रकांत चणेकर व कृष्णा गांवठणकर ( डिचोली ) यांच्या वतीने साजरा करण्यांत आला असे श्री ज्ञानेश्वर साळगावकर पिळगाव हे कळवितात. ★

# संतश्रेष्ठ श्रीगुलाबमहाराज ह्यांची मुंबापुरीस भेट

● श्रीक्षेत्र काटेल, जि. बुलढाणा, नागपूर येथील संत श्री गुलाबबाबा ह्यांनी नुकतीच मुंबईस भेट दिली. कुर्ला येथील साईभक्त डॉ. गव्हाणकर ह्यांच्या घरी श्री बाबा शनिवार दि. १७-७-७६ रोजी दुपारी २ वाजतां आले व तेथे त्यांचे रात्रौ बारा वाजेपर्यंत वास्तव्य होते. ह्या दहा तासांच्या कालावधीत अक्षरशः हजारो भक्तांनी श्री

बाबांचे दर्शनसुख लुटले. श्रीबाबांनी भक्तगणासह भजनाचा गजर उठवून सर्व भक्तगणांना मंत्रमुग्ध केले. ह्यासमयी डॉ. गव्हाणकरांनी समयोचित श्रीसद्गुरुनाथांचेविषयी प्रवचन केले. श्रीगुलाबबाबांनी डॉक्टरांच्या वाणीवाटे खुद्द श्रीसाईबाबा बोलले असे म्हणून त्यांचा आदरसत्कार केला.

श्रीगुलाबबाबांच्या समवेत जवळजवळ पन्नास एक वारकरी मंडळी होती. ही सर्व मंडळी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला जाऊन परतताना देहू, आळंदी, पुणे, लोणावळामार्गे मुंबईला आली होती. श्री. बाबांचे नित्य सहवासात असणारे श्री. सुधाकर बडकस, श्री. भालचंद्र बूट, श्री. दा. न. देशमुख, श्री. नंदू इत्यादींनी एकंदर व्यवस्थेबद्दल व कार्यक्रमाविषयी समाधान व्यक्त केले, तसेच खुद्द श्री बाबानी श्रीक्षेत्र पंढरपूरच्या खालोखाल डॉ. गव्हाणकरांच्या निवासस्थानी आपले मन रंगले असे उद्गार त्यांच्या निकटवर्तियांकडे काढले. रविवारी बाबा ठिकठिकाणी आपल्या भक्तांकडे गेले व सायंकाळी ८ वा. ते श्री. प्रभाकर बडकस यांच्या वांद्रे येथील निवासस्थानी आले. रात्री १२ वाजेतोपर्यंत शेकडो भक्तांनी श्रीगुलाबबाबांचे डोळे भरून दर्शन घेतले. श्री. बाबांनी सर्वांना शुभाशिष प्रदान केले. ★

# प. पू. श्री. मिटकर महाराजांचे 'श्रीपाद' मध्ये अशी साजरी झाली गुरुपौर्णिमा

आम्ही चकोर गुरुचंद्रमा । आम्ही कळा तू पौर्णिमा. पौर्णिमेला सागराला उधाण येते. सागरलाटा उचंबळून येतात. चंद्राला भेटण्याकरिता जणु त्या आवेगाने नृत्य करतात. तशीच अवस्था गुरुपौर्णिमेच्या दिवशी आर्त भक्तांची झालेली असते. काहींच्या आर्ततेची पूर्ती झालेली असते. काहींच्या मनात आर्ततेच्या उर्मी दाटलेल्या असतात. अशा भक्तीच्या उर्मी-लाटा ज्यावेळेस गुरुद्वारावर आपटू लागतात. त्यावेळेस निरंजन वनात मायेची कवाड बंद करून तटस्थ राहीलेल्या गुरुमायेची समाधि उतरते. आणि प्रेमाची कवाडे खुलतात. माया मोहाच्या विकारवशतेने पीडलेल्या आर्तभक्तजनांच्या सादाला गुरुमाय प्रतिसाद देते आणि भक्तांचा ओघ गुरुपददर्शनार्थ धावतो.

असा हा सोहळा दरवर्षी गुरुपौर्णिमेला सद्गुरु श्री. बापूसाहेब मिटकर महाराजांच्या निवासस्थानावर पहावयास मिळतो. सध्या कलीयुगामध्ये फक्त अन्नमय कोषच शिल्लक असल्यामुळे मानवी शरिराला हट, लय, तंत्र, मंत्र व ध्यान या साधना

सोसण्यासारख्या नाहीत. मानवी शरीर व मन या धकाधकीच्या काळात अतिशय दुबळे झालेले आहे. रोजच्या गरजा भागवता भागवता ते शरिर टेकीस येते. त्या कल्पित गरजांची पूर्ती केल्यास इश्वराचे अस्तित्व अज्ञजनांस कळेल व भक्तिमार्गाचा सुकाळ होईल. या प्रेरणेने अनेक संतानी जन्म घेतले व चमत्कारहि दाखवले. त्या संतमालिकेतील मेरुमणी अतिंद्रिययोगी श्री. मिटकर महाराज हे होत.

गुरु पौर्णिमेला महाराजांचे मुक्तव्दार असते. सर्व जाती जमाती व सर्व धर्मियांना महाराजांचे अगदी जवळून दर्शन घडते. याच कारणाने लांबलांबून व बाहेरगावाहून लोक दर्शनासाठी येतात व बंगल्यामध्ये व बंगल्याबाहेरहि रांगा लावून उभे असतात. अत्यंत शांत, शिस्तबध्द वातावरणात उत्सव साजरा होतो. एवढी गर्दी असते पण ना दंगा, ना धोका, ना लहान मुलांचे रडणे. पण सर्व जणू काही नियतीने आखल्याप्रमाणे चालू असते. ही एक ईश्वरी लीलाच नाही का ? श्री. दत्तात्रयाचे दर्शन घेऊन सर्वजण एका ओळीमध्ये महाराजांच्या दर्शनास जातात. ज्यांची भाग्ये उघडावयाची असतात व जे खरोखरच गरजू असतात त्यांना महाराजांच्याकडून मार्गदर्शन केले जाते व त्यांची संकटे निवारण केली जातात. आत जाताना व्याधींनी, काळजींनी ग्रासलेला मनुष्य त्याच्या नुसत्या चेहऱ्याकडे बघितले तरी समजून येतो. व तोच बाहेर जाताना चिंतामुक्त होऊन हसतमुख दिसतो. ज्याप्रमाणे एखादी वस्तू कृष्णार्पन करतात, त्याप्रमाणे महाराजांच्या पायावर आपल्या सर्व काळज्या, चिंता सर्व एकसमयावच्छेदे सोपवून निष्काळजीपणे लोक बाहेर पडत असतात व हा सर्व बोजा महाराज आनंदाने आपल्या भक्तासाठी पेलत असतात. गुरुपौर्णिमेच्या दिवशी महाराज सतत ब्रम्ह स्थितीत असून संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणे हे विश्वचि संपर्क साधून असतात. त्यावेळेस त्यांचे तेज काय वर्णन करावे ! वर्णन करून समजणार नाही कारण ते स्वरूप वर्णन करायला शब्दच अपुरे ठरतात आणि लेखणीसुद्धा तोकडी पडते. सकाळी ९ ते ११।१२ व संध्याकाळी ३॥ रात्री ११।१२ एवढ्या वेळेस दर्शनाचा कार्यक्रम असतो तरीही वेळ अपुरी पडते. गुलाबपुष्पांच्या पाकळीप्रमाणे त्यांचा चेहरा सतेज व आरक्तवर्ण असतो. हे नीट मुखावलोकन केले असता नजरेतून सुटणार नाही. एवढेच काय, पण त्यांच्या वास्तुतल्या देवाचा फोटो, दत्ताचे मुखवटे यांनीसुद्धा सजीवता धारण केलेली असते. महाराजांच्या समोर हारांचा, फुलांचा ढीग पडलेला असतो. त्यातूनच एखादा गेंडेदार निवडक फुलांचा हार बाजूला काढून महाराज आपल्या माननीय सद्गुरुंच्या साईबाबांच्या समाधिकडे पाठविण्याच्या सूचना देण्यात गर्क असलेले दिसतात. श्री बापूसाहेबानी केलेले चमत्कार श्री. अक्कलकोट स्वामी साईबाबा किंवा श्री गुरुचरित्रांत वर्णन केलेल्याप्रमाणेच अलौकिक आहेत. त्यांचे मुंबईचे एक सेवेकरी व फुलाचे व्यापारी श्री. गुंजाळ हे प्रत्येक उत्सवाला ही सर्व वास्तु

फुलांची सजावट करून देतात. फुलांची रंगसंगति काय वर्णावी व ती प्रत्यक्ष बघितल्या-शिवाय समजणारच नाही. इतक्या उत्कृष्टतेने रंगसंगती साधलेली असते की उन्हाळ्यात देखील फुलाने डवरलेल्या महाबळेश्वराची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. रस्त्यावर दुतर्फा फुलांची दुकाने थाटलेली असतात व ती घेण्यासाठी लोकांची अलोट गर्दी. एवढे पाहिल्यावर कुणाहि अनोळखी माणसास समजते की हा अतिंद्रीय योगी श्री. बाबासाहेब निटकर महाराजांचा परिसर असावा.

याचवेळी सामान्य माणसाच्या जीवनात येणाऱ्या अडचणी प्रश्न उत्तरे देखील ते अत्यंत नम्रतेने देवून त्यांच्या अडचणी दूर करत असत. यामुळे त्यांचेकडे गरीब, श्रीमंत, जातिभेद, धर्मभेद नसल्यामुळे लोकांचा ओघ अखंडपणे चालूच राहिला. रोज दार बंद असूनसुद्धा हजारो लोक बाहेरून दर्शन घेवून श्रद्धेने परत जातात व त्यांची कार्यसिद्धी होते. ही बाहेरून दर्शन घेणाऱ्यांची प्रचिति असल्यामुळे वडारवाडीतील "श्रीपाद" बंगल्याला जागृत देवस्थानाचे स्वरूप आले आहे. त्याच्याकडे होणाऱ्या उत्सवाला केवळ त्यांचे जवळून दर्शन व्हावे म्हणून ५ । ५० हजार लोकांच्या शिस्तबद्ध रांगा ताटकळत असतात. रोज बंगल्यात फाटकासमोर केवळ लांबून का होईना ओझरते दर्शन व्हावे म्हणून बरेच लोक ताटकळत थांबलेले दिसतात. गेल्या चाळीस बेचाळीस वर्षांच्या या सिद्धभूषित अलौकिक जीवनामध्ये ते कोणाच्याहि पैशाला मिंधे राहिले नाहीत. पैसा घेणे तर राहोच परंतु त्याची अपेक्षाहि त्यांनी कधी केली नाही. उत्सवाच्या दिवशी महाराजांना पुष्पहार, नारळ, पेढे व अन्य मिठाई व फळे लोक अर्पण करतात. पण या आलेल्या सर्व वस्तूंना श्री महाराज हस्तस्पर्श करून प्रसाद म्हणून लगेच परत करतात शिवाय लोक श्रींचा आशिर्वाद व दर्शन घेवून माघारे फिरतात ते नवजीवन घेवूनच !

रा. ना. हर्डीकर,
४८८ गणेशखिंड रोड, पुणे १६

# श्रीसाईबाबांची विद्युत प्रकाशित छबी बनविणारे

# कल्पक शिल्पकार—श्री. कुलकर्णी

● श्री साईनंद

वेस्टर्न रेल्वेच्या दादर–माटुंगा स्टेशनच्या मधे, रेल्वे रस्त्याला अगदी समांतर जाणाऱ्या मार्गावर ज्या लहान–मोठ्या कंपन्या आहेत त्यामधे 'फोझेमिन' या नावाची एक कंपनी आहे. या कंपनीचे संचालक आहेत श्री. जनार्दन गंगाधर कुलकर्णी. मोठे कल्पक शिल्पकार म्हणून ते कलाप्रांतात चांगलेच परिचयाचे आहेत. अलिकडे त्यांनी भगवान श्रीसाईबाबांची एक रंगीत सुंदरशी छबी तयार केलेली आहे. ही प्लेट तयार करण्यासाठी त्यांना खूप कष्ट करावे लागले. ही अजब प्लेट विजेच्या प्रकाशात उजळली तर साक्षात श्री साईबाबांचे मोठे मोहक दर्शन घडते. त्यांच्या अपूर्व कामगिरीबद्दल खरोखरच त्यांचे कौतुक करावेसे वाटते. आपल्या लेखनाच्या मेजावर त्यांनी तयार केलेली ही प्लेट ठेवली तर मेज व त्या सभोवतालचा परिसर मोठा खुलून दिसतो, व भक्तिभावाने पहाणाऱ्याचे हात श्री बाबांच्या या विद्युत छबीसमोर जोडले जातात.



श्री. कुलकर्णी

श्री साईबाबांच्या प्रमाणे अनेक देवादिकांच्या व संतांच्या अशा प्रतिमा त्यांनी तयार केलेल्या आहेत. श्री. कुलकर्णीसाहेब हे मूळ कोकणातील देवगडचे. त्यांचे शालेय शिक्षण मुंबईस झाले. १९२९ साली मराठा हायस्कूलमधून मॅट्रीक ते उत्तीर्ण झाले. छायाचित्रणकलेची त्यांना जन्मजात आवड म्हणून की काय त्यांनी पुढच्या शिक्षणाला रामराम ठोकला व 'सागर मुव्हिटोन' या फिल्म कंपनीत ते नोकरीस राहिले. सुरुवातीला त्यांनी तिथे प्रोसेसिंग या विभागात वर्षभर काम केले व नंतर हैद्राबादच्या निजामाच्या इस्टर्न फिल्ममधे दोन वर्षे लॅबोरेटरी असिस्टंट म्हणून त्यांनी उमेदवारी केली. नंतर भवनानीच्या अजंठा फिल्मस् कंपनीत तीन–चार वर्षे असिस्टंट सुपरवायझर म्हणून काम केले. नंतर वाडिया मुव्हिटोनमधे तीन–चार वर्षे ते लॅब असिस्टंट होते. त्यांनी मिळविलेल्या या सर्व अनुभवातून १९४० साली त्यांनी बॉम्बे फिल्म लेबोरेटरीची स्थापना केली. परंतु

धंद्यातील अनेक अडचणीमुळे त्या संस्थेतून बाहेर पडून फिल्म सिने लॅबोरेटरीजमधे लॅब इनचार्ज म्हणून ते काम पाहू लागले.

एवढा पंधरा वर्षांचा छायाचित्रण क्षेत्रातला अनुभव घेतल्यावर त्यांना असे दिसून आले की प्रोसेसिंगला लागणारे फोटोग्राफीक सेन्सिटिव्ह मटेरियल हे परदेशातून येत होते. चित्रपट दुनियेत त्याला भरपूर मागणी होती तेव्हा याचे उत्पादन आपण स्वतःच येथे केल्यास देशाला त्याचा फायदा होईल. या उद्देशाने श्री. कुलकर्णी यांनी संशोधन सुरू केले. या संशोधनातून त्यांना हवे असलेले सेन्सिटिव्ह मटेरियल तयार करण्यात त्यांनी यश मिळविले. नंतर स्टीमशीप कंपनीचे श्री. चौगुले, नागपूरचे श्री. धनवटे व डॉ. वी. एन्. पुरंदरे यांचे सहकार्याने चेंबूर येथे १९६० मधे त्यांनी फोटो रिसर्च लॅबोरेटरी काढली. फोटोग्राफीक पेपर्सचे उत्पादन करणारी ही भारतातील पहिली कंपनी होय. आज ही कंपनी वरसोवा, अंधेरी जवळ अस्तित्वात आहे.

कागद ही वस्तू फोटो सेन्सिटिव्ह मटेरियलसाठी वापरात असली तरी त्यावर घेण्यात आलेले प्रिंटस हे कित्येक वर्षे टिकत नाहीत. तेव्हा कागदाव्यतिरिक्त एखादा धातू वापरल्यास काय होईल हे संशोधन करण्यासाठी हार्ड कॅसल बॉडचे श्री. जे. के. रेगे यांच्या मदतीने 'ऑल्फोस्मिन' ही कंपनी स्थापन करून श्री. कुलकर्णी यांनी संशोधन सुरू केले. संशोधनानंतर त्यांना असे दिसून आले की सिल्व्हर व स्टेनलेस अशा महाग धातूपेक्षा ॲल्युमिनियम हा स्वस्त परवडण्याजोगा धातू सेन्सिटिव्ह मटेरियल म्हणून वापरता येईल असे आढळले.

हे संशोधन पूर्ण झाल्यावर मेटाग्राफचे मालक श्री. मुसळे यांच्या भागीदारीत त्यांनी 'फोझेमिन' ही कंपनी चालू केली. शुद्ध ॲल्युमिनियम विकत घेऊन त्यावर निरनिराळया प्रक्रिया करून शेवटी सेन्सिटिव्ह इमल्शनचे थर देऊन 'ॲल्युमिनियम फोटो सेन्सिटाइज्ड मटेरियल तयार केले. 'फोझेमिन' सध्या हेच बनविते. अशा प्रकारे तयार झालेल्या पत्र्यावर हवेचा, पाण्याचा, आगीचा काहीच परिणाम होत नाही. शिवाय हे पत्रे ॲसिड प्रुफ असतात त्यामुळे फोटो प्रिंटस् चिरकाल टिकणारे असतात. अशा प्रकारचे पत्रे व त्यावर प्रिंटस तयार करणारी 'फोझेमिन' ही भारतातील एकमेव कंपनी आहे. या पत्र्यांचा तसेच यावरील प्रिंटसच्या उपयोग गुन्हेगार झटकन् शोधून काढण्याच्या दृष्टीने गुन्हेगारांचे फोटो, त्यांच्या हाताचे ठसे या अशा ॲल्युमिनियमच्या पत्र्यावर काढल्यास उपयुक्त ठरतात. ऐतिहासिक दुर्मिळ चित्रे, महत्वाचे कागदपत्र, जुन्या मुंबईच्या आखणीचे कागद, रेल्वे, नगरपालिकेचे नकाशे इ. भावी पिढीला उपयुक्त ठरणाऱ्या वस्तू या पद्धतीने दिर्घकाल टिकविता येतात. श्री. कुलकर्णी यांच्या या अजब संशोधनामुळे महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील असंख्य कंपन्यांनी आपल्या नोकरवर्गासाठीची ओळखपत्रे, जी छातीवर लावायची असतात ती

ही त्यांचेकडून तयार करवून घेतली आहेत. याच प्रकारच्या पत्र्याचा उपयोग करून त्यांनी देवदेवतांचे फोटो तयार केले आहेत व त्यांच्या पिछाडीला जर विद्युतदीप लावला तर हे फोटो चित्ताकर्षक वाटतात. या पद्धतीने तयार केलेला श्रीसाईबाबांचा फोटो जर टेबलावर ठेवला तर तो इतका मोहक दिसतो व रात्री प्रकाशात तो इतका उजळून निघतो की विचारता सोय नाही. अगदी लाजबाब! श्री. कुलकर्णी यांना या नवलपूर्ण संशोधनाबद्दल वर्ल्ड प्राईजही मिळालेले आहे. ते भगवान श्रीदत्तात्रेयाचे उपासक आहेत. हाजी मलंग बाबावर त्यांची श्रद्धा आहे. श्रीसाईबाबांना ते भजतात, आळवतात. श्रीबाबांच्या कृपेचा वरदहस्त त्यांच्यावर व त्यांच्या उद्योगधंद्यावर कायमचा राहो हीच शुभेच्छा.



**नमो देवी, नमो देवी**
**भगवती श्रीमहालक्ष्मी, नमोस्तुते।**

# शिरडी-वृत्त माहे जून सन १९७६

जून महिन्यामध्ये बाहेरगावाहून येणाऱ्या साईभक्तांची गर्दी कमी प्रमाणात होती. काही कलाकारांनी श्रीपुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे :-

**कीर्तन** :- श्री. ग. वि. जोशी शास्त्री संस्थान गवई यांची कीर्तने नेहमी प्रमाणेच झाली.

**प्रवचन** :- १) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे शिरडी.
२) ह. भ. प. बालयोगी ओतुरकर महाराज, ब्राह्मणगाव, कोपरगाव.

**भजन** :- १) ह. भ. प. बाळू महाराज व बालभजन मंडळी, धानोरा बीड. २) ह. भ. प. नारायण स्वामी व भजन मंडळी, कुर्ला, मुंबई. ३) शिशुकला भजनी मंडळ, ठाणे. ४) मिसेस आर. व्ही. राजन् व मंडळी, नवी दिल्ली. ५) ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली, येवला. ६) सत्यसाई सेवा समिती, सदाशिव पेठ, पुणे. ७) श्री. कृष्णमूर्ति म. भिडे, हुबळी.

**गायन, वादन** :- १) सौ. लक्ष्मी रामन्, ग्वालियर २) श्री. चंद्रशेखर म. देशपांडे, हडपसर, पुणे. ३) श्री. शामसुंदर ल. भेडा, संगमनेर. ४) श्री. राजाराम द. आंबर्डेकर, वेंगुर्ला, रत्नागिरी. ५) श्री. विठोबा ता. लभडे, येवला. ६) श्री. रमेश वि. कागडे, इन्दौर. ७) कु. शैला ब. पेठे, नासिक.

**सन्मानियांच्या भेटी** :—

१) मा. श्री. बाबूराव काळे गृह परिवहन, विधानकार्य, उपमंत्री महाराष्ट्र राज्य.
२) मा. श्री. इ. एस. मोडक पोलीस महानिरीक्षक महाराष्ट्र, मुंबई.
३) मा. श्री. व्ही. एस. मलीमठ. न्यायमूर्ती उच्च न्यायालय, कर्नाटक राज्य.
४) मा. श्री. पारेख साहेब न्यायमूर्ती सीटी सिव्हील कोर्ट, मुंबई.
५) मा. श्री. व्यंकटरामन् I.A.S. मॅनिजिंग डायरेक्टर आंध्रप्रदेश, इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कार्पोरेशन, हैद्राबाद.
६) मा. श्री. पद्मनाभय्या I.A.S. जिल्हाधिकारी, नासिक.
७) मा. श्री. श्यामाचरणजी शुक्ला, मुख्यमंत्री मध्यप्रदेश, भोपाळ.
८) मा. श्री. बारावकर डी. एस. पी. अ. नगर.
९) मा. श्री. प्रधान आयकर आयुक्त पुणे.
१०) मा. श्री. चतुर्वेदी डी. आय. जी. नासिक.

**हवापाणी** :- शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# नमस्कार साई-चरणकमलास

संत साईबाबा श्रीकृष्ण अवतार
मुखी हरिनाम स्मरणामृताची धार ॥ध्रु०॥
दाविले चमत्कार भक्तिस्थापनेसाठी
बाबा आहेत भक्तजनांची खरी काठी
वाहती त्यांचावर खऱ्या भक्ताचा भार ॥१॥
संत साईबाबा......
द्रौपदीचा धांवा ऐकूनी हरि धांवले
तैसे बाबाही भक्तासाठी धावून आले
दिला संकटी निराधार भक्ता आधार ॥२॥
संत साईबाबा......
नांवही कसे "गुलाब" फूलाप्रमाणे गोड
कृपेने कैसी लावी भक्तभ्रमरासी ओढ
ज्यांत दया मकरंद कंद भक्तिसार ॥३॥
संत साईबाबा......
आमचेही जीवन एका क्षणांत दयेने
हरिमय केले बाबा पहा लीलेने
'मधु' म्हणे वारंवार पदी नमस्कार ॥४॥
संत साईबाबा......

— मधुकर ओंकार आखरे, मु. पो. बटवाडी, ता. बाळापुर जि. अकोला

---

# — तुझ्या वरी भरी भार —

तुझ्या कृपेची नांव लाभता —
होइन भवभय पार ॥
साईजी तुझाच रे आधार ॥
लाभता तुझाच रे आधार ॥ ध्रु० ॥
तू कनवाळू—तूच कृपाळू ॥
कशास मी दुःखाश्रू गाळू ? ॥
तुझ्या दयेचे उघडे ठेवी
सदैव मजला दार ॥ १ ॥
— माय पिता तू तूची भ्राता ॥
तुजला ध्याता—हरि सौ चिंता ॥
निर्भय मी तर सदा ठेवुनी ॥
तुझ्या वरी भरि भार ॥ २ ॥

— मधुभाई चेंदवणकर, शिरोडा–गोवा.

## ॥ साईनाथ माझा हरी ॥

रामाच्या ग पारामंदी स्मरण करिते बाबांचे
सूर घुमतो भक्तिचा साईनाथ माझा हरी साईनाथ माझा हरी ॥ध्रु०॥
घरट्यात आली जाग पिलापाखरांना
हंबरूनी बोलाविते गाय वासरांना
फुलला भक्तिचा ग पारिजात माझ्या दारी
साईनाथ माझा हरी साईनाथ माझा हरी ॥१॥
नित्य होई अंगणी माझ्या भक्तिची बरसात
आनंद ग खेळतो बाई माझ्या सदनात
तव कृपेने सुख आले माझ्या दारी
साईनाथ माझा हरी साईनाथ माझा हरी ॥२॥
भक्त करी गर्जना साई नामाचा
मुखी मंत्र बोले त्याच्या "ओम् साईचा"
साई पूजनाची कानी घुमे ललकारी
साईनाथ माझा हरी साईनाथ माझा हरी ॥३॥

– कमल पां. गोरे म्युनि. एफ बिल्डिंग, ब्लॉक नं. ४ सायन आगरवाडा मुं. नं. २२.

---

## साई-माऊली

साई तुझी मला रोज आठवण येते
शिर्डीस येण्यास मन ओढावते ॥१॥
रोज स्वप्नात मी शिर्डीस येते
आणि तुझे मी दर्शन घेते ॥२॥
एकदा दोनदा शिर्डीस येऊन
तृप्ती न होई तुझे दर्शन घेऊन ॥३॥
साई, तूच माझी माता, तूच माझा पिता
तूच माझा बंधू, तूच माझा सखा ॥४॥
किर्तन, भजन कानावर येई
मग असे वाटते की बोलावितो साई ॥ ५॥

–कु. सुषमा धा. नाचणे
गणेश मंदिर, ३६, कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुं. नं. ६९.

65

# श्री साईच्या समाधी समोर

अश्रु, दुःख,
अंतकरणाने म्हणालो,
बाबा, साई, देवा,
माझा कोण आहे कसे करू
माझ्याजवळही काही नाही, काय, कसे करू !
कोणाला सांगु ? कोणाकडे बोलू ?
या जगांत माझा कोण आहे ?
रडत होतो, समाधीला सांगत होतो !
आवाज आला, अरे
घाबरू नको, "मी आहे"
तुझ्या भावना सारखे माझे अस्तित्व
तुझे दुःख नाहीसे होतील, शुद्धभावाने,
तुला तुझ्या भावनाप्रमाणे,
आनन्द, शान्तता, पवित्रता,
सुख, विश्रांती, सर्व लाभेल.
एकच,
संशय सोडून, अनन्य भावाने,
शरण ये !!

– प्रा. गुंडेराव पटवारी एन्. एफ. जे. कॉलेज, बिदर (कर्नाटक).

---

## — बिनती —

देख साई कितना सुखी हूँ
मैं इस दुनिया में !
नहीं चाहिये इतना सुख मुझे
तू वापस लेले !
तूनेही सबके दुःख लिये है
कुछ मुझे भी दे दे !
हो सकू मैं सहाय किसी का
गर मौका दे दे !
मेरी प्रियाको दुःख में मेरे सुख
पाने की शक्ती दे दे !!

–शान्ताराम पवार,
इन्डियन एअर लाइन्स, राजकोट (गुजरात) ३६० ००१.

# श्री सद्गुरू कमुबाबा यांच्या प्रेरणेने शिर्डी दर्शन

पाहूनी आले मी शिर्डी नगरी ।
साई मंदीराचे कळस सोनेरी ।
त्यावरी डोलतो ध्वज साई कीर्तीचा ।
करूनी वंदन नमितो भक्त प्रेमाचा ।
बैसला शिलधीराजा रौप्य सिंहासनावरी ।
शोभतो संत सम्राटाचा थाट साई दरबारी ।
भक्ती सुमनांची ओंजळ वाहूनी समाधीवरी
साईलीला गाती नाचती भक्त मोद भरी ।
द्वारकाधीशाची ही चरित्र लीला गाथा ।
आठवते मशीदं माईत भेटला द्वारकानाथा ।
साईकरकमलाने चेतविली ही धुनीमाई ।
लेकूरां रक्षण्या उदीप्रसाद देते आई ।
गुरूस्थानी लिंबातळीरूप प्रकटले बाळ साईचे ।
ऊद जाळूनी आदेश पाळीती भक्त सद्गुरूचे ।
रोपटी लावूनी फुलविली बाग साईनी ।
विश्रांतीस्तव येती लेंडी बागेत जाऊनी ।
चावडीला जाता साई पालखीचा सोहळा अपूर्व ।
निद्रेचे ते स्थान शांत दिसे शोभीवंत ।
शिर्डी साई दर्शनाची गोडी वाटे घ्यावी नित्यनूतन ।
आळविते शांता साईदयाघना रूज रात्रंदिन ।

– सौ. शांता अंबाजीराव सरोदे
उद्यैगल बिल्डिंग नं. ६ खो. नं. १०,
एन. सी. केळकर रोड, दादर २८.

57

# "श्री साई कृपावंत"

मनी वाटे एकोनी साई लीला।
कधि वाटे जाईन शिरडीला ॥

लांब त्यांच्या गावास जाउनीया।
कुणी आल्या गेल्यास भेटुनीया ॥ १ ॥

काय महिमा त्या असे शिरडीचा।
कुणी सांगी चमत्कार साईजीचा ॥

मनी जाण्याची एक असे घाई।
कधि आर्थिक हा प्रश्न उभा राही ॥ २ ॥

'साई' बाबांनी काय कसे केले।
प्रश्न आर्थिक जे ते ही सोडविले ॥

बढती माझ्या देऊनि नोकरीत।
असे बाबा 'श्री साई' कृपावंत ॥ ३ ॥

कृपावंताचे हे असे कृपा छत्र।
तया माझा साष्टांग दंडवत ॥

दान आता हे एक असे द्यावे।
संत चरणाचे दास असू द्यावे ॥ ४ ॥

दा. ना. देशमुख,
सक्करदरा, नागपूर.


प्रसिद्ध झाले!

## शिरडीनिवासी सच्चिदानंद सद्गुरू श्री साईनाथ

( लेखक : र. श्री. पुजारी )

प्राप्तिस्थळ :

१. श्रीक्षेत्र शिरडी
२. जयश्री प्रकाशन, ९९२ सदाशिव पेठ, पुणे – ३०

# "साईनाथ स्मरा"

साईनाथ स्मरा हो साईनाथ स्मरा हो
साई जाळतील सर्वांची सर्व पापे हो ।
साईनामा मध्ये जादू
साई ध्यानामध्ये जादू
साई करतील बरे सर्व रोगराई हो ॥
साई दीनांचे कैवारी
साई गरिबाना वारी
साई दलितांचे उद्धारी
साई भक्तांचे रक्षण करीं हो ॥
साई देतील सुख
साई देतील शांती
साई देतील समाधान
साई देतील धन
साई देतील दौलत
साई पुरवतील सर्वांच्या सर्व इच्छा हो ॥
साई पावतील दीनाना
साई पावतील रोग्याना
साई पावतील गरिबाना
साई पावतील दलिताना
साई पावतील भक्ताना
साई पावतील संकटकाळी
साई संकट परिहारी हो ॥
साई मत् माता
साई मत् पिता
साई मत् बंधू
साई मत् भगिनी
साई मत् सखा
साई माझे सगे सोयरे हो ॥
साई दाखविती सर्वांना दया
साई करिती सर्वांवरी प्रेम
साई माझे सर्व काही हो ॥
नमस्कार साष्टांग त्या माझ्या "साई"ला हो ॥

श्री. अमीनगड ए. एम्. बी. ए. (ऑनर्स) बी. एड्.
मु. पो. गुळुंचे ता. पुरंदर जि. पु

५७

# साधुसंत येती घरा । तोचि दिवाळी दसरा

आपल्या घरी श्रीसाईलीला अंक आला की प्रत्यक्ष बाबाच आले असे भाविक समजतात, अंक वाचताना त्यांना प्रत्यक्ष शिर्डीला भेट देऊन आल्याचा प्रत्यय येतो, मग असा हा अंक आपल्याकडे हवाच नाही का ?

❀

# श्रीसाईलीला दिवाळी अंक १९७६

## भक्तांच्या अनुभवांची बरसात

श्रीसाईभक्तांनी श्रीबाबांच्या संबंधीचे आलेले आपले ताजे "स्वानुभव त्वरित" संपादक श्री साईलीला 'साईनिकेतन', प्लॉट क्रमांक ८०४ बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई २८ येथे उशिरात उशिरा २५ ऑगस्ट १९७६ पर्यंत सुवाच्च अक्षरात कागदाच्या एकाच बाजूने लिहून पाठवावेत.

**जुने व एकदा प्रसिद्ध झालेले अनुभव पुन्हा मुळीच पाठवू नयेत.**

श्रीसाईलीला बहारदार दिवाळी अंक-२० ऑक्टोबरला भक्तांच्या हाती येत आहे.

●

पृष्ठे १००

किंमत १ रु. २५ पैसे

मुखपृष्ठावर श्रीसाईबाबांचे पंचरंगी मोहक व संग्राह्य चित्र

Regd. No. MH/BYE/26

## साधु संत येती घरा । तोचि दिवाळी दसरा ।



पण केवळ साधु संतच नव्हे तर प्रत्यक्ष "रामावतारी" "कृष्णावतारी" "दत्तावतारी" भगवान् सच्चिदानंद सद्‌गुरू **श्रीसाईबाबा** (शिरडीचे) आपल्या घरी येतील तो तुमच्या आयुष्यातील **'सोनियाचा दिस'** होय.

आजच श्रीसाईबाबांची शीलाखंडावरील पूर्णाकृती पंचधातूची (ब्राँझ) अभंग मूर्ति खरेदी करून आपल्या घरी बाबांना कायमच्या वास्तव्याला बोलवा. मग काय रोज पूजा आरती नैवेद्य म्हणजे जणू काय **"आहले घराचे मंगल देऊळ !"**

अशा तऱ्हेने साईभक्ताचे प्रत्येक घर हे एक लहान का होईना पण प्रत्यक्ष बाबांचे मंगल देऊळ बनावे अशी इच्छा मनी धरून आम्ही श्रीसाईबाबांची ९ इंच उंच व ५ इंच रुंद अशी पंचधातूची अत्यंत मजबूत अशी मूर्ति बनविली आहे. जिला अगदी लहान मुलांपासूनसुद्धा फारसे जपावे लागत नाही.

मूर्तीचे खास वैशिष्ट्य म्हणजे ती पंचधातूची व योग्य साईजची बनविल्यामुळे एक तर मूर्ति ताम्हनांत ठेवून तिला सुवासिक अत्तराने अगर पंचामृताने स्नान, अभिषेक घालता येतो. तसेच मूर्तीला डोक्यावर शिरपेंच, मुकुट इत्यादि अलंकार व फेटा अगर इतर रंगीबेरंगी पोषाखाने मूर्ति अत्यंत शोभिवंत करून आपल्याला कमालीचे मानसिक समाधान मिळते.

मूर्तीची किंमत अत्यंत वाजवी ठेवली आहे !

तसेच श्रद्धावंत भक्तांच्या काही अडचणीही आम्ही लक्षात घेऊन योग्य प्रकारे सहाय्य करू ! बाहेरगावी मूर्ति पोस्टाने अगर व्ही. पी. ने पाठवू.

"मूर्तीच्या स्थापनेसाठी सुबक डिझाईनचे लाकडी देव्हारे उपलब्ध आहेत."

अधिक माहिती वा इतर तपशिलासाठी प्रत्यक्ष भेटा अगर लिहा :–

**श्री. मनोहर घनःशाम पितळे,**
पितळेवाडी, हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०,००५७
फोन नंबर : ५७ ६२ ९८. भेटण्याची वेळ : सकाळी ७ ते ९ रात्रौ ७ ते ९.

मुद्रक : **पांडुरंग मोरे**, बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.
४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई–३१.
संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक, 'साई निकेतन'**, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी. दादर, मुंबई–१४.


श्री बाबांनी तेलाभावी पाण्याने पणत्या प्रज्वलित केल्या
Padnekar
अवचित करीं दिवाळी । जळांत भिजवी लावीं वात ।
माझा काय मौजेचा साईनाथ ॥
६० पैसे
१९७६

# अनुक्रमणिका– सप्टेंबर १९७६


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय | – आधी वंदू तुज मोरया |
| २) | श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकर | – सदानंद चेंदवणकर |
| ३) | युगावतार श्रीसाईबाबा | – श्री. चंद्रकांत सामंत |
| ४) | बाबा नाथपंथीच होते | – श्री. सुरेश सातपुते |
| ५) | वयोवृद्ध साईभक्त | – श्री. नानासाहेब रासने |
| ६) | तुमचे साईबाबांविषयी सामान्यज्ञान किती आहे | – श्री. माधवराव गोरे |
| ७) | ओम् म्हणजे काय ? | – डॉ. अनिल जायस्वाल |
| ८) | श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकरांची दोन पदे | – श्री. अनंत पै काणे |
| ९) | कर्म | – विनायक पाठक |
| १०) | हृदयी माझ्या प्रतिष्ठापले श्री सद्गुरुसाई | – श्री. शंकर इनामदार |
| ११) | दोन नाथपंथी संत–राममारुती व श्रीसाई | – सदानंद चेंदवणकर |
| १२) | गुरूची पालखी | – सौ. निर्मला देशपांडे |
| १३) | ग्रंथभेटींचा स्वीकार | – श्रीसाईनंद |
| १४) | श्रीसाई भक्त – एक चिंतन | – शाम जुवळे |
| १५) | नामामृत | – श्री. पांडुरंग भुजबळ |
| १६) | वाऱ्यावरचे विचार | – श्री. द. शं. टिपणीस |
| १७) | वाचकांचा पत्रव्यवहार | – श्री. घोलप, श्री. गर्जे, श्री. आ[illegible] |
| १८) | शिर्डीवृत्त–माहे जुलै–७६ | – – |
| १९) | बाबांची चिलीम | – डॉ. एस. एस. तेंडुलकर |
| २०) | श्रीसाई | – श्री. ना. पु. अवस्थीकाका |
| २१) | गोदावरी काठी | – सौ. आशा इंगळे |
| २२) | अवतरे श्रीसाई माउली | – श्री. जगन्नाथ कुलकर्णी |

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्री सा ई वा क्सु धा

ाणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः ।
ुरुभ्यो नमः । श्रीकुलदेवतायै नमः ।
ीसीतारामचंद्राभ्यां नमः ।
ीसद्गुरु साईनाथाय नमः ।
य सद्गुरो आनंदघना ।
नस्वरुपा परमपावना ।
जयाजी भवभय निकंदना ।
किमलदहना परिपूर्णा ॥१॥
आनंदे सागर तुजवरी ।
ठती नाना वृत्तिलहरी ।
ही तूंच तूंच आवरीं ।
पा करी निज भक्तां ॥२॥
ांधारीचा जो साप ।
 प्रकाशी दोर आपाप ।
ांधार प्रकाश स्वरूप ।
हींचा बाप तूं एक ॥३॥
ाकार वृत्तीचा जनिता ।
ळाच दोराचा आकार देता ।
 भीतीतें उत्पन्नकर्ता ।
ी निवारताही तूंच ॥४॥
ी जेव्हां पूर्णाधार ।
ी सर्प नाहीं दोर ।
 डाचा नाहीं थार
ी निराकार तूं होसी ॥५॥
—श्रीसाईसच्चरित् अध्याय २२ वा

# श्रीसाईलीला


[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे
अभिकृत मासिक ]

❀

वर्ष ५५ वे] सप्टेंबर ७६ [अंक ६

❀

: संपादक :

श्री. का. सी. पाठक,
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६—०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४—बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४
दूरध्वनी : ४४ ३२ ३१

## संपादकीय—

स. न. वि. वि.

# आधी वंदू तुज मोरया



● आमच्या भारतात श्रीगणपतीची उपासना, पूजा-अर्चा अनादि कालापासून चा
आहे. गणेश ही प्रतीकात्मक देवता परमेश्वराचा अवतार होय अशी भाविकांची ह
श्रद्धा आहे. पृथ्वीतलावर दुष्ट दैत्यांनी माजविलेल्या अत्याचारी वृत्तींना नष्ट कर

टाकण्यासाठी, अनीतीची माजलेली वृत्ती दूर करण्यासाठी हा परमेश्वरी अवतार झाला. व्योमासुर, मेघासुर, कामासुर, क्रोधासुर, छायासुर, लोभासुर, कूटासुर, मोहासुर, कर्दमासुर, मदासुर, मत्सरासुर, अशा एकापेक्षा एक बलिष्ठ अशा राक्षसांचा संहार, नाश या गजाननानेच केला असे मुद्गल पुराणात उल्लेखिलेले आहे. अशी ही देवता गजानन, गणेश, विनायक, गणपती, लंबोदर, वक्रतुंड, सुखकर्ता, मयुरेश्वर इत्यादी विविध नावांनी प्राचीन काळापासून तो आजलागायत भारतात व भारताबाहेर सर्वत्र प्रसिद्ध आहे. गजाननाच्या या नावापैकी विनायक नावाचा अवतार कृतयुगातला, मयूरेश्वर त्रेतायुगातला गजानन हा द्वापार युगातला आणि धुम्रकेतू हा चालू कलियुगातला आहे असे सांगितलेले आहे. परंतु असे असूनसुद्धा चालू युगात विनायक, गणेश आणि गजानन या नावाचे अवतार सर्वत्र पूजिले जातात.

भारताप्रमाणेच परदेशातही याच देवतेची उपासना चालत असे याचे अनेक पुरावे आहेत. त्या त्या देशातील संशोधनावरूनही ही गोष्ट सिद्ध झालेली आहे. भारताबाहेर आजही कित्येक देशातून या देवतेला अनन्यभावे पूजिले जाते. पण या सर्वांपेक्षा महाराष्ट्रातच या देवतेला विशेष आदराने पूजिले जाते याचे कारण श्रीगणपतीची प्रसिद्ध असलेली आठ ठिकाणे महाराष्ट्रातच आहेत हे होय.

ज्याप्रमाणे शिवशंकराची बारा ज्योतिर्लिंगे भारतात सर्वत्र विखुरलेली आहेत, त्याप्रमाणे श्रीगणेशाची अष्टपुराण प्रसिद्ध जागृत अशी देवस्थाने समजली जातात. या आठ परमपवित्र स्थानांना 'अष्टविनायक' म्हणतात. आपल्या हिंदुधर्मात विवाहविधी सारख्या मंगलप्रसंगी मंगलाष्टकातून ही आठ स्थाने गुंफलेला सुंदर श्लोक म्हणण्याची पद्धती आहे. तो श्लोक सर्वांनीच अगदी पाठ म्हणून ठेवण्यासारखा आहे तो असा—

स्वस्ति श्रीगणनायकं गजमुखं मोरेश्वरं सिद्धिदं ।
बल्लाळं मुरुडं विनायकमहं चिंतामणिं थेवरम् ।।
लेण्याद्रिं गिरिजात्मकं सुवरदं विघ्नेश्वरं ओझरम् ।
ग्रामे रांजण संस्थिते गणपतिः कुर्यात् सदा मंगलम् ।।

शिवपुराण, स्कंद पुराण, ब्रह्मविवर्त पुराण, गणेशलीलामृत, गणेश पुराण, गणेश भागवत, लिंग पुराण, मुद्गल पुराण, गणेश प्रताप, विनायक महात्म्य, चिंतामणि विजय इ० पुराण प्रसिद्ध ग्रंथातून गणेशाच्या विविध अवतारांचे व त्याच्या लीलांचे वर्णन केलेले आहे.

इसवी सन १८९३ साली ग्वाल्हेरला थाटात साजरा केल्या गेलेल्या पहिल्या सार्वजनिक गणेशोत्सवानंतर गणेशाचे महत्त्व महाराष्ट्रात वेगळ्या प्रकारे वाढत गेले व त्यास लोकमान्य टिळकांची राजकीय संघटीत दृष्टी कारणीभूत झाली ही गोष्ट खरी परंतु त्यापूर्वी 'गणेश यात्रा' म्हणून भाद्रपद व माघ हे महिने सर्वत्र गणेशोत्सवी महिने म्हणून मानण्यात येत असत. हे मास हिंदु सणात आजही 'गणेशमास' म्हणूनच

प्रसिद्ध आहेत व या यात्रेस आजही पूर्वीप्रमाणेच लाखो लोक आपापल्या इच्छि अशा गणेशस्थानी नियमाने गर्दी करीत असतात. 'गणेश वारी' हे गणे भक्तात जे एक व्रत स्वीकारण्याची पूर्व परंपरा आहे ते स्वीकारणारे 'गणेश वारकरी या यात्रेस अगदी न चुकता त्या त्या स्थानी यात्रेसमयी मुक्कामच करीत असता

गणेशवारीला पूर्वी 'गणेश स्वारी' असेही संबोधण्यात येत असे. या दिव यात्रेकरू गणनायकाना घोडयावरून मिरवणुकीद्वारे मिरवण्यात येत असल्याने 'स्वारी' हा शब्दप्रयोग झाला असल्यास न कळे. परंतु 'वारी' म्हणजे 'वार' बांधून त वाराला त्या स्थळी जाण्याचे जे व्रत आहे ते स्वीकारणाऱ्या भक्तांचा 'वारकरी दि भाद्रपद–माघ यात्रा या गणेशभक्तात वारीचा दिन म्हणून प्रसिद्ध आहे.

हिंदु सणांची आखणी ही पूर्वजांनी कारण परंपरेला धरूनच केली आहे. त्या माघ व भाद्रपद हेच काय महिने गणेशयात्रा दिन व गणेश अवतार दिन मानण्या साठी फार मोठी कारण परंपरा आहे.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भाद्रपद व माघ हे पहिल्या व दुसऱ्या पिकाचे सुगीचे दिवस असतात. यावेळी सारी पृथ्वी समृद्ध स्थितीत असते. पिकाच्या धारणेने तिची प्रकृतीही नाजूक असते व अशा स्थितीत जलप्रलय, भूकंप, टोळधाड, वायुस्वारी, पिकांचे रोग हे संधि साधून नेमके तिच्यावर हल्ला करतील याचा निय नेम नसतो. यामुळे पिकांचा नाश करणाऱ्या या आसुरी साधनांचा वध करण्यासाठ या महिन्यात गजाननमुखाचे अवलोकन करण्याची व त्याची सामुदायिक प्रार्थन करण्यासाठी या यात्रेची मांडणी असावी.

धर्मशास्त्रज्ञांनी आखलेल्या रूढीतील गजयात्रा आसुरी संरक्षणार्थच असल्या मुळे आपत्तीपासून रक्षण व्हावे म्हणून आजही या वारीत कित्येकजण संसार र णाऱ्या याचनेस्तव या माघ–भाद्रपदी गणमासास अग्रस्थानी मानून कुठल्या परिस्थितीत या यात्रेस हजर रहात असतात. अष्टविनायक यात्रा हे एक गणेशव्र आहे. अष्टविनायकांचे अष्टयात्रेत दर्शन घेणे हा दुर्लभ योग साधणाराला य सिद्धीचा वर मिळतो असे मानण्यात येते.

असो—सध्याचे दिवस हे मंगलमूर्तींच्या सहवासात रहाण्याचे भाग्यशील अ दिवस आहेत. सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. आबालवृद्धांनाही पुलकीत करण असे वातावरण आहे. मित्र, पै–पाहुणे यांचे घरोघरी जाणे येणे या निमित्याने चाल असते. गप्पागोष्टींना अगदी ऊत येतो. आरती, प्रसाद, भजन, किर्तन, मेळे, नाट व्याख्याने, चित्रपट इत्यादींची तर दहा दिवस रेलचेल असते. आमच्या शिर्डीत श्रीगणरायाची, विघ्नहराची मूर्ती प्रतिष्ठापित केली जाते व तिलाही अनन्य पूजिले जाते. सर्वांना आनंद देणाऱ्या व भक्तांचे दुःख हरण करणाऱ्या अशा गणनायक गणेशाला आपणही वंदन करू या.

तिदत्त म्हणून ख्याती पावलेले —

# श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीकर

— सदानंद चेंदवणकर
१२०/४०५५, "राधामाधव,"
टिळक नगर, चेंबुर, मुंबई ८९



श्रीपंत महाराज

● बेळगाव शहराच्या पूर्वेला सुमारे पंधरा किलोमीटर अंतरावर बाळेकुंद्री नावाचे एक छोटेसे पण निसर्गरमणीय असे गाव आहे. या लहानशा गावाला एका महान क्षेत्रस्थानाचे स्वरूप आलेले आहे, याचे कारण या गावाच्या पावनभूमीत एक महान दत्तावतारी सत्पुरुष वावरत होते आणि याच भूमीत त्यांनी आपली महासमाधी लावली. हे महान- कर्मयोगी सत्पुरुष म्हणजे श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीकर हे होत.

पंतांचा जन्म श्रावण वद्य अष्टमी शके १७७७ म्हणजे ३–९–१८५५ रोजी दड्डी येथे झाला. त्यांच्या मातोश्रीचे नाव सीताबाई व वडिलांचे रामचंद्र. पंतांचे पाळण्यातील नाव श्रीकृष्ण, पण पुढे दृष्टांत होऊन 'दत्तात्रय' असे दुसरे नाव ठेवण्यात आले.

बेळगाव येथे त्यांनी शिक्षण घेतले. १८७२ साली त्यांनी इंग्रजी शिक्षणाला आरंभ केला. पब्लिक सर्विसची परीक्षा दिली व १८८० साली ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. पुढे केवळ उदरनिर्वाहासाठी म्हणून त्यांनी बेळगावच्या मराठी मिशन स्कूलमधे अवघ्या १२ रु. पगारावर शिक्षकाची नोकरी पत्करली. बेळगावच्या लंडन मिशन स्कूलचे त्यावेळचे मुख्य चालक रे. स्मिथ साहेब यांना आपल्या शाळेचा मॅट्रिक पास झालेला विद्यार्थी मराठी शाळेत बारा रु. पगारावर नोकरी करतो हे आवडले नाही, म्हणून त्यांनी स्वतः पंतांकडे जाऊन त्यांचे मन वळवून त्यांना लंडन मिशन स्कूलमधे